MHLA050002232024

**विशेष दरखास्त क्र.५०/२०२४ मधील नि.क्र.१३ वरील आदेश**
**[ लक्ष्मण ..वि.. शासन व इतर ]**

सदरकामी जाबदार क्र.१ आणि २ यांनी अर्ज देऊन नमुद केले की, याकामी त्यांच्याविरुध्द एकतर्फा आदेश झालेला आहे आणि तो रद्दबातल होऊन मिळावा.

**२.** अर्जदाराने दिलेल्या आपल्या म्हणण्यात ऋणको यांना सर्व कागदपत्रे दिनांक १३/०६/२०२४ रोजी प्राप्त झाले असुन त्यांनी काम चालण्यास उशीर व्हावा म्हणुन प्रस्तुत अर्ज दिला असल्याचे नमुद केले. त्यामुळे त्यांना दंड व्हावा असे नमुद केले.

**३.** प्रस्तुतची दरखास्त ही भुसंपादन निर्देशन अर्जामधील निवाडयाच्या वसुलीसाठी आहे. त्यामध्ये जाबदार क्र.१ आणि २ हे शासन प्रतिनिधी आहेत. त्यांना दरखास्तीची समज मिळाल्यानंतर दिनांक १२/०८/२०२४ रोजी हजर होणे आवश्यक होते. मात्र दिनांक ०४/०१/२०२५ रोजी हजर झाल्यावर त्यांनी प्रस्तुत अर्ज दाखल केला.

**४.** या अर्जामध्ये उशिरा अर्ज दाखल करण्यासाठी काय कारण घडले याचा उल्लेख नाही. त्यांच्या विरुध्दचा आदेश रद्दबातल का करावा याचा उल्लेख नाही. तो आदेश रद्द न झाल्यास शासनाला काय नुकसान होणार आहे याबद्दल भाष्य नाही.

**५.** अशा स्वरुपाचा अर्ज दाखल करताना वरील सर्व बाबी नमुद असणे आवश्यक आहे. शासनाने त्यांना एखाद्या प्रकरणामध्ये संधी दिल्यानंतर तिच्याकडे दुर्लक्ष करणे व कालांतराने हजर होऊन गमावलेली संधी पुन्हा मिळवण्यासाठी अर्ज देणे हा कालापव्यय करण्याचा प्रकार आहे.

**६.** त्यामुळे या प्रकरणात जाबदार क्र.१ आणि २ यांनी कोणत्याही स्वरुपात कालापव्यय न करण्याच्या अटीवर प्रस्तुत अर्ज मंजुर करणे योग्य आहे.

**७.** शासनास दंड लावावा असे अर्जदारातर्फे सांगण्यात आले. मात्र शासनास दंड लावल्यास तो सर्वसामान्य नागरीकांच्या खिशातुन जाईल. त्यामुळे शासनास दंड न आकारता वर नमुद अटीवर अर्ज मंजुर करण्यात येतो.

**स्वाक्षरीत/-**

**दिनांक:१७/०२/२०२५.**

**[ एस.एन.सरडे ]**
दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.